मत्स्यव्यवसाय क्षेत्रात सहकाराच्या माध्यमातून समृद्धी आणणार

केंद्रीय मंत्री अमित शाह

मुंबई : हॅलो प्रभात

सहकाराच्या माध्यमातून दुग्ध व्यवसाय, साखर उद्योगांनी देशात व राज्यात मोठ्या प्रमाणात समृद्धी आणण्याचे काम केले. त्याप्रमाणे देशातील मत्स्यव्यवसाय क्षेत्रातही समृद्धी आणण्यासाठी सहकार तत्वावरील परिसंस्था (ईको सिस्टीम) येत्या पाच वर्षात निर्माण करण्यात येईल, असे केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी सांगितले.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ व राज्य शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या सहयोगाने प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेंतर्गत खोल समुद्रातील मासेमारी करणाऱ्या नौकांचे सहकारी संस्थांना वितरण व उदघाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड येथे पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, गृह व सहकार राज्यमंत्री पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश कुमार, मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन. आदी उपस्थित होते.

अमित शाह म्हणाले की, आज दोन नौका देत असलो तरी पुढील काळात ही

योजना मच्छिमारांसाठी अतिशय उपयुक्त ठरणार आहे. भविष्यात भारताच्या मत्स्य संपतीच्या क्षमतेत वाढ होणार असून त्याचा लाभ मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील मच्छिमारांना थेट होणार आहे.

प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेंतर्गत सध्या राज्यातील सहकारी संस्थांना १४ नौका देण्यात येत असून, पुढील पाच वर्षांत किमान २०० नौका समुद्रात उतरवण्याचे लक्ष्य प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केले आहे. या नौका २५ दिवस खोल समुद्रात राहून २० टनांपर्यंत मासे पकडू शकतील. या नौकांमधून मासे गोळा करून किनाऱ्यावर नेण्यासाठी एक मोठे जहाजही उपलब्ध करण्यात येईल. या नौकांच्या माध्यमातून होणारा नफा हा थेट मच्छिमारांपर्यंत पोहोचणार असून त्यातून त्यांची आर्थिक समृद्धी होईल. १,१९९ किलोमीटर लांबीच्या किनारपट्टीवर अपार क्षमता असून याचा लाभ आपल्या जास्तीत जास्त मच्छीमारांपर्यंत पोहोचवणे हेच केंद्र शासनाचे उद्दिष्ट आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, दूध उत्पादन, साखर उद्योग असो की, मत्स्यव्यवसाय क्षेत्र असो नफ्याचा वाटा हा थेट कष्टकरी, गरीबांपर्यंत पोचविण्यासाठी सहकार हाच मार्ग आहे. सहकार भावनेतूनच खऱ्या अर्थाने मानवी दृष्टिकोन असलेला जीडीपी निर्माण होतो. प्रत्येक कुटुंब समृद्ध झाले, तरच देश समृद्ध होईल.

दूध व्यवसाय व साखर उद्योग हे सहकारी संस्थांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील गावांना समृद्ध करण्याची महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्या माध्यमातून त्यांनी नफा थेट कष्टकरी शेतकऱ्यांपर्यंत पोचविला. याप्रमाणेच मत्स्य व्यवसाय क्षेत्रातही होणारा नफा मत्स्यपालन करणाऱ्या मच्छिमारांपर्यंत थेट पोचविण्यासाठी सहकार मॉडेल तयार करीत आहे.

केंद्र शासनाने मत्स्यव्यवसाय आणि सहकार विभागांच्या सहकार्याने प्रक्रिया, शीतकरण आणि निर्यात सुविधा आणि संकलनासाठी मोठी जहाजे उभारण्याचा आराखडा तयार केला आहे. यामुळे मासेमारी क्षेत्रात ग्रामीण विकासाला चालना मिळेल आणि मच्छीमारांना थेट निर्यात नफ्याचा लाभ होईल, असा विश्वासही अमित शाह यांनी यावेळी व्यक्त केला.

सागरी व्यापार आणि उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करेल

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : हॅलो प्रभात

सागरी व्यापार आणि उद्योगाशी संबंधित आज करण्यात आलेल्या सामंजस्य करारांच्या माध्यमातून येत्या काळात महाराष्ट्र देशाच्या सागरी व्यापार आणि उद्योग क्षेत्राचे नेतृत्व करेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नेस्को, गोरेगाव येथे आयोजित इंडिया मेरीटाईम वीक २०२५ मध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत १५ विविध सामंजस्य करार करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, बंदरे विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी प्रदीप आणि सामंजस्य करार करण्यात आलेल्या कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अनेक कंपन्यांसोबत सागरी इकोसिस्टिम विकासासाठी सामंजस्य करार करण्यात आले असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, सुमारे ५६ हजार कोटी रुपयांचे हे करार आहेत. यामुळे महाराष्ट्राला सागरी व्यापार आणि विकासाच्या क्षेत्रात आघाडीवर नेण्यात मदत होईल. बंदर, वाहतूक, उद्योग आणि व्यवसाय या क्षेत्रातील सुविधा जागतिक दर्जाच्या बनतील.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस पुढे म्हणाले, मुंबईसाठी जल वाहतूक महत्त्वाची आहे. रो-रो

सेवा सुरू झाल्यानंतर नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आता गेटवे ऑफ इंडिया ते नवी मुंबई विमानतळ दरम्यान वॉटर टॅक्सी सेवा सुरू केली जाणार आहे, ज्यामुळे प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात वाचेल. तसेच, इलेक्ट्रिक व्हेसल (एतर्शीशश्र) ताफा आणला जात आहे, ज्यामुळे जलवाहतूक स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनेल.

राज्यात जल क्रीडा केंद्रे, जहाज बांधणी उद्योग, आणि ब्ल्यू इकॉनॉमी प्रकल्प विकसित होत आहेत. वाढवणसारखे मोठे बंदर उभारण्यात येत असून, त्यामुळे महाराष्ट्र देशाच्या सागरी क्षेत्रात नेतृत्व करेल, वाढवण बंदर राज्यातील महत्त्वाच्या शहरांशी रस्ते मार्गे जोडले जाणार आहे. त्यामुळे वाढवण बंदराचा फायदा संपूर्ण राज्याच्या विकासासाठी होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.

ई रिक्षा सुरु करण्याची कार्यवाही गतीने करा

- पर्यटनमंत्री शंभूराज देसाई

मुंबई : हॅलो प्रभात

माथेरान येथील पर्यटन विषयक पायाभूत सुविधांची कामे स्थानिक प्रशासनाने गतीने करावीत. मा.सर्वोच्च न्यायालयाने माथेरान येथे ई- रिक्षा सुरू करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार माथेरान येथे पर्यटन वाढीच्या दृष्टीकोनातून ई-रिक्षा सुरू करण्यासाठीची कार्यवाही गतीने करण्याच्या सूचना पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे माथेरान येथील पर्यटन विषयक पायाभूत सुविधा व माथेरान मधील स्थानिक समस्याबाबत आयोजित आढावा बैठकीत पर्यटनमंत्री शंभूराज देसाई बोलत होते. बैठकीला

आमदार महेंद्र थोरवे, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव डॉ.अतुल पाटणे, कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी, पर्यटन संचालक डॉ. बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, दूरदृश्यप्रणालीव्दारे रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, श्रमिक रिक्षा चालकमालक संघटना माथेरानचे सचिव सुनिल शिंदे, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे यासह इतर संबधित अधिकारी उपस्थित होते.

पर्यटनमंत्री शंभूराज देसाई म्हणाले की,माथेरान हे पर्यटनदृष्ट्या महत्वाचे असलेले शहर आहे. येथे पर्यटनासाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणात लाखो पर्यटक भेटी देत असतात हे लक्षात घेता येथील स्थानिक पर्यटन विषयक महत्वाच्या असलेल्या पायाभूत सुविधांची कामे गतीने करण्यात यावीत.

वाहनतळासाठी आरक्षित असलेला भूखंड विनामोबदला माथेरान नगरपरिषदेकडे हस्तांतरित करण्याकरिता महाराष्ट्र रस्ते विकास प्राधिकरणाने कार्यवाही करावी तसेच या ठिकाणी असलेली अतिक्रमणे त्वरीत हटवण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. माथेरान पर्यावरण संवेदनशील सनियंत्रण समितीने ऑफलाईनही बैठक आयोजित करावी, अशा सूचना यावेळी त्यांनी केल्या.

'पीएम जनमन' योजनेतील कामगिरीसाठी महावितरणचे कौतुक

मुंबई : हॅलो प्रभात

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान म्हणजेच पीएम जनमन योजनेमध्ये महावितरणने केलेल्या कामगिरीचे व १३१ टक्के उद्दिष्टपूर्तीचे केंद्रीय विद्युत मंत्रालयाने कौतुक केले आहे. याबाबत केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. पंकज अग्रवाल यांनी राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांना पाठवलेल्या पत्रामध्ये महावितरणच्या कामगिरीचा गौरव केला आहे.

देशातील दुर्गम भागात निवासी व सर्वार्थाने दुर्बळ आदिवासी गट यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी केंद्र शासनाने पीएम जनमन योजना सुरू केली आहे. दुर्गम भागातील अतिमागास जनजाती समूहांना सुरक्षित घरे, पिण्याचे पाणी, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, उपजीविकेच्या संधी आणि वीज यासारख्या मूलभूत सुविधा व सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात या योजनेअंतर्गत राज्यातील १६ जिल्ह्यांतील ११३७ गावांमध्ये लाभार्थ्यांना नवीन वीजजोडण्या व त्यासाठी विद्युतीकरणाची कामे महावितरणकडून वेगाने सुरू करण्यात आली. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनीही या कामांचा वेळोवेळी आढावा घेतला. त्याची फलनिष्पत्ती म्हणजे योजनेमध्ये १३१ टक्के उद्दिष्टपूर्ती झाली आहे. महाराष्ट्रासाठी ८ हजार ५५६ लाभार्थ्यांना वीजजोडणी देण्याचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात तब्बल ११ हजार २३५ घरांमध्ये नवीन वीजजोडणी कार्यान्वित करण्यात आली आहे.

राज्यस्तरीय शालेय व्हॉलिबॉल स्पर्धांच्या आयोजनाचा सांगलीला मान

सांगली : हॅलो प्रभात

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या पत्रानुसार १९ वर्षाआतील मुली या वयोगटाच्या राज्यस्तरीय शालेय व्हॉलिबॉल स्पर्धा व १९ वर्षाआतील मुले व मुली या वयोगटाच्या राज्यस्तरीय शालेय मल्लखांब क्रीडा स्पर्धेच्या आयोजनाचा मान सांगली जिल्ह्याला मिळाला आहे. व्हॉलिबॉल स्पर्धांचे आयोजन दि. २ ते ४ नोव्हेंबर या कालावधीत होणार असून, स्पर्धांचे आयोजन दर्जेदार करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी आज येथे दिले.

जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात आयोजित या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे, क्रीडा उपसंचालक सुहास पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर, जिल्हा माहिती अधिकारी संप्रदा बीडकर, उप शिक्षणाधिकारी नागेश ठोंबरे आदि उपस्थित होते. जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, दोन्ही स्पर्धा राज्यस्तरीय असल्याने संपूर्ण स्पर्धेचे नियोजन राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार काटेकोर करावे.

मुंबईतील फुटबॉलपटूंना सुवर्णसंधी लिओनेल मेस्सी सोबत खेळण्याची संधी

मुंबई : हॅलो प्रभात

महाराष्ट्र संस्था फॉर ट्रान्सफॉर्मेशन, सिडको आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार क्रीडा विभागामार्फत, राज्यभरात महादेवा प्रकल्पांतर्गत शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा उद्देश राज्यातील फुटबॉल खेळाचा विकास, प्रसार व लोकप्रियता वाढविणे हा आहे. ही योजना १३ वर्षांखालील मुलं व मुली यांच्यासाठी असून अर्जदारांची जन्मतारीख ०१ जानेवारी २०१२ ते ३१ डिसेंबर २०१३ दरम्यान असणे आवश्यक आहे.

या योजनेअंतर्गत जिल्हा, विभागीय आणि राज्य स्तरावर फुटबॉल निवड चाचण्या आयोजित केल्या जाणार आहेत.

या निवड चाचण्यांच्या माध्यमातून राज्यातील ३० मुलं आणि ३० मुलींची अंतिम निवड करण्यात येणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंना १४ डिसेंबर २०२५ रोजी मुंबईत जागतिक ख्यातीचे फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांच्यासोबत खेळण्याची अविस्मरणीय संधी मिळणार आहे.

मुंबई जिल्ह्यासाठीची निवड चाचणी नवल डीब्रुसूझा फुटबॉल ग्राउंड, बांद्रा (मुंबई) येथे होणार असून, केवळ ऑनलाईन नोंदणी केलेल्या खेळाडूंनाच या निवड चाचणीसाठी माहिती व पुढील मार्गदर्शन मिळेल. नोंदणीसाठी https://forms.gle/6P-R766JoC9d2QH26 लिंक सक्रिय करण्यात आलीफुटबॉल खेळात उच्च कौशल्य असलेले आणि पात्रता निकष पूर्ण करणारे खेळाडूच नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क सुधा राणे ९३२२८ २३०३५ श्रीमती. मनीषा गारगोटे, राज्य क्रीडा मार्गदर्शक, फोन नंबर -८२०८३७२०३४ यांना संपर्क साधावा.

'दक्षता जनजागृती सप्ताह' निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

मुंबई : हॅलो प्रभात

भ्रष्टाचार निर्मुलनासाठी जागरूकता निर्माण करण्याच्या हेतुने दरवर्षी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ३१ ऑक्टोबर या जन्मदिनापासून 'दक्षता जनजागृती सप्ताह' साजरा केला जातो. यावर्षी २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीच्या सप्ताहाची संकल्पना 'दक्षता आपली सामायिक जबाबदारी' अशी ठेवण्यात आली असून राज्य शासनाच्या सर्व विभागांमध्ये या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सप्ताहाची सुरुवात २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता भ्रष्टाचार निर्मुलनाच्या प्रतिज्ञेने होणार असून सर्व शासकीय कार्यालयांमध्ये ही प्रतिज्ञा घेण्यात येईल. त्यानंतर राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांनी दिलेले संदेश वाचून दाखवले जातील. तसेच हे संदेश राज्यातील जनतेपर्यंत विविध माध्यमांद्वारे पोहोचविण्यात येतील. सप्ताहादरम्यान कार्यालयांच्या दर्शनी भागात तसेच सार्वजनिक ठिकाणी भ्रष्टाचाराविरोधी जनजागृतीचे बॅनर, पोस्टर आणि संदेश प्रदर्शित करण्यात येतील. मोठ्या शहरांमधील मोक्याच्या ठिकाणी जनजागृती संदेश प्रदर्शित करण्याबरोबरच निबंध, वक्तृत्व, चित्रकला यासारख्या स्पर्धांचे आयोजन केले जाईल. या बरोबरच भ्रष्टाचार निर्मूलनावर आधारित जनजागृती साहित्य व पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येईल. राज्य शासनाच्या सर्व विभागांमध्ये चर्चासत्रे, कार्यशाळा व विविध कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे.

'दिलखुलास' 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात रूचेश जयवंशी यांची मुलाखत

मुंबई : हॅलो प्रभात

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिल- खुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात 'अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना व उपक्रम' या विषयावर अल्पसंख्यांक विकास विभागाचे सचिव रूचेश जयवंशी यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे.

'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत गुरूवार दि. २९ शुक्रवार, दि.३० आणि शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर तसेच 'News On IR' या मोबाईल ॲपवर ऐकता येणार आहे. तर 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत मंगळ वार, दि. ४ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर पाहता येणार आहे. तसेच

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमांवर देखील उपलब्ध होईल. ही मुलाखत निवेदिका शिबानी जोशी यांनी घेतली आहे.राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत राज्यातील अल्पसंख्यांक समाजासाठी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. शासनाच्या 'सर्वांसाठी विकास' या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी या योजना महत्त्वपूर्ण ठरत आहेत. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, मुक्त व निवासी विद्यालये, तसेच व्यावसायिक प्रशिक्षण व रोजगार क्षमतेसाठी विशेष प्रोत्साहन कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्वयंरोजगाराच्या योजना तर युवकांसाठी 'कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम' राबविले जात आहेत. त्याचबरोबर, अल्पसंख्याक समाजातील उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी व्याजमुक्त कर्ज योजना, भांडवली अनुदान योजना, आणि व्यवसाय मार्गदर्शन उपक्रम सुरू आहेत.

या योजना यांची अंमलबजावणी याविषयी सविस्तर माहिती सचिव श्री. जयवंशी यांनी 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात दिली आहे.

मच्छीमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना

मुंबई : हॅलो प्रभात

राज्यातील सागर किनाऱ्यावरील सर्व मच्छीमारांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, पश्चिम किनारपट्टीवर २५ ते २९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. त्यामुळे वाऱ्याचा वेग ३५ ते ४५ किमी प्रतितास राहील. काही ठिकाणी तो ५५ किमी प्रतितासपर्यंत जाऊ शकतो. त्यामुळे हवामान विभाग आणि भारतीय तटरक्षक दलाने मच्छीमारांना समुद्रात न जाण्याचा इशारा दिला आहे. समुद्रामध्ये असलेल्या सर्व मासेमारी नौकांनी तात्काळ सुरक्षितपणे बंदरात परत यावे तसेच स्थानिक बंदर अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.